Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA





Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

Ajanta Prakashan

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २६ | पौगंडावस्थेतील बालकांच्या भावनिक विकासावर दूरचित्रवाणीचे होणारे परिणाम (एक अध्ययन)<br>**कु. पुर्णिमा [illegible]श्राम**<br>**प्रा. डॉ. माधुरी ना. कोकोडे** | १२०-१२३ |
| २७ | भारतीय प्रजासत्ताकात म. गांधीजीचे मौलिक योगदान<br>**कु. ऋतुजा पांडूरंग बावचकर** | १२४-१२५ |
| २८ | प्रजासत्ताक भारत व म. गांधीजींचे शिक्षणविषयक विचार<br>**डॉ. रेखा आर. बने** | १२६-१२७ |
| २९ | स्वयंसहायता गट आणि विकास<br>**प्रा. डॉ. अव[illegible]रे जयेश मो.** | १२८-१३९ |
| ३० | भारतातील स्त्री मुक्ति चळवळींचा इतिहास<br>**कांवळे पांडुरंग पंढरी** | १४०-१४३ |
| ३१ | जनसंपर्क : संकल्पना व जनसंपर्काचे बदलते स्वरुप<br>**गणेश वासुदेव पानझाडे** | १४४-१४७ |
| ३२ | स्त्री मुक्ती आंदोलनाची गंगोत्री सावित्रीबाई<br>**प्रा. श्रावन ब. कापगते** | १४८-१५१ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २७. भारतीय प्रजासत्ताकात म. गांधीजीचे मौलिक योगदान

**कु. ऋतुजा पांडूरंग बावचकर**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर.

भारताच्या नवनिर्माणात राजा राममोहन रॉय यांच्या पासून ते स्वातंत्र्यवीर सावरकर, म. गांधी, राम मनोहर लोहिया, दीनदयाळ उपाध्याय आदी महापुरुषांनी मौलीक योगदान दिले आहे. त्यापैकी म. गांधी यांचे कृषी, उद्योग, आरोग्य आणि शिक्षण आदी क्षेत्रातील योगदान मोलाचे आहे. गांधी हे एक आदर्शवादी, मानवतावादी व युगप्रवर्तक नेते होते. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आयुष्यभर सतत कार्य केले. सत्य व अहिंसा या ततवाचा स्विकार करुन मला असा भारत निर्माण करावयाचा आहे की जिथे गरीवातील गरीब माणंसाना असे वाटले पाहीजे की हा आपला देश आहे व त्याची जडणघडण करण्यामध्ये आपला वाटा आहे. माणसातील माणूसपण हरवत चाललेल्या समाजाला आज खऱ्या अर्थाने गांधीजीच्या सत्य आणि अहिंसा, न्याय व माणुसकीची पवित्र भावना यांना मध्यवर्ती स्थान देणे आवश्यक आहे. भारतीय तत्त्वज्ञानामध्ये सत्य आणि अहिंसा ही मुल्य मुलमंत्र समजली जातात.

**अभ्यासाचे महत्व**

भारतीय राजकारणात गांधीचे आगमन झाल्यानंतर त्यात आमूलाग्र परीवर्तन झाले. परंपरागत राजकारणात बदल करुन नैतीकता व आध्यात्मिकरणाची जोड गांधीजीनी त्याला दिली. गांधीजीच्या नेतृत्वाने भारतीयांना एका विशिष्ट ध्येयाने जात, धर्म, लिंग आदि स्वरुपाचा भेदभाव दुर करुन एकत्र आणले. गांधीच्या सत्य आणि अहिंसा तत्वाचा स्विकार करुन ब्रिटीश सत्तेला झुगारुन लावता आले. आज जगात अनेक समस्या भेडसावत आहेत. ज्यामध्ये वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार, विषमता, अमानुषपणा, हिसांचार आदीचा प्रामूख्याने उल्लेख करता येईल.यासाठी अनेक कायदे तयार करुन त्या समस्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र त्याला म्हणावे तसे यश मिळत नाही. तेव्हा या समस्याचे निराकरण करण्यासाठी पुन्हा एकदा गांधी तत्वज्ञानाचा स्विकार जगाने करण्याची आवश्यकता आहे.

21 व्या शतकातील भारत सदृढ व बलशाली म्हणून पाहावयाचा असेल तर गांधीजीच्या विचाराची आज गरज आहे. आज संपूर्ण विश्वावर दृष्टीक्षेप टाकला तर असे दिसून येते की, संपूर्ण जग विलक्षण वेगाने भेदभावाच्या दिशेने वाटचाल करीत असून भ्रष्टाचार, स्वैराचार, हिंसाचाराच्या जाळयात पूर्णपणे फसले आहे. जगाचा फार मोठा भाग अज्ञान, रोगराई, भुक, दारीद्रय, सांप्रदायीकता, गरीबी, चारीत्र्यहिनता, स्त्रियांवरचे अत्याचार, बालमजूरांचे शोषण, समाजातल्या प्रत्येक गटाचे दुसऱ्या गटापासून वाढणारे अंतर, भाषा, सीमा, पाणी यावरुन होणारे प्रांताचे झगडे इत्यादीनी जनता व सरकारही व्यस्त आहे. या परीस्थितीतून जगाला गांधी विचारच तारु शकतात. गांधीजीचे सत्य आणि अहिंसावादी विचार जगाला आधात्मवादी व मानवतावादी बनवू शकतात. साध्य आणि साधन हा त्याच्यां विचाराचा मुख्य गाभा आहे. अन्यायाचा प्रतिकार हा सत्य आणि अहिंसा हा सत्याग्रहाच्या मार्गाने करता येतो. हे त्यांनी आपल्या विचारातून आणि कृतीतून दाखवून दिले आहे. बलाढय साम्राज्य शक्तीचा प्रतिकार अहिंसेच्या मार्गाने करता येतो. हे त्यांनी जगाला दाखवून दिले. गांधीजीच्या सर्व विचारांचा आधार सत्य तत्व होय. सत्याशिवाय कोणतेही तत्व

पुर्ण होत नाही. म. गांधी सत्यालाच परमेश्वर मानायचे. 'Truth is God' त्यामूळे त्यांनी सत्य आणि ईश्वर यांचा संवध जोडला आहे.

सत्य आणि अहिंसेचे अस्त्र हे हृदयाच्या निर्मलतेतील आहे. जोपर्यंत मन आणि हृदय निर्मल होणार नाही. तोपर्यंत आपण अहंकार, लालसा, ईर्ष्या, प्रतिस्पर्धा, क्रोध यासारखे दुर्गुण दुर करणार नाही. जिथे सगळया प्रकारचे असत्य आणि खोटे असते. तिथे सत्य पाळणाऱ्याला प्रचंड समस्यांना सामोरे जावे लागते. असत्याला सत्व नसते. ते मायावी असून सत्याच्या वाटसरुंना भ्रमित करीत असते. सत्यासाठी निंदा, उपहास, प्रतारणा आणि कष्ट सहन करण्यास हिचकू नये कारण वाहेरील निंदा, उपहास आणि शारीरीक कष्ट आपल्या आत्म्यापर्यंत पोहोचणार नाहीत. सत्य कधीही लपत नसते. खोटयाला मानणारा स्वतःच आपल्या दृष्टीतून हिन असतो. दुसऱ्यावर त्याचा प्रभाव पडत नाही. तो सर्वाच्या दृष्टीने हिन बनतो.

गांधीजी स्वतः सत्याच्या मार्गावर चालत होते. त्यांनी केलेल्या चुका वडीलांना पत्र लिहून आत्मप्रायश्चित केले होते. त्यांना वाईट मित्राची संगत, धुम्रपान, मांसाहार यासारख्या वाईट सवयी लागल्या होत्या. कर्जबाजारीही झाले होते. पुस्तके विकून कर्ज फेडले. हे सर्व आत्मप्रायश्चितातून सोडून दिले म्हणून त्यांना सत्याबददल बोलण्याचा अधिकार होता. आपण केलेल्या चुकाचे प्रायश्चित केले नाही तर जीवनमार्ग भटकू शकतो. सत्याचे पालन कोणत्याही परीस्थितीत कोणतीही किमंत मोजून केले पाहीजे. सत्याचा अर्थ सर्वावर प्रेम, सेवा आणि आध्यात्मिक एकता प्राप्त करणे हा होय. सत्य सर्वोच्च दया व सर्वोच्च आत्मबलीदान आहे. या मार्गावर चालण्याचा मुलमंत्र जर जगाने स्विकारला तर वरील समस्या दुर तर होतीलच आणि अशा समस्याचा पून्हा जन्म होणार नाही. अहिंसा हे सत्याच्या ध्येयाकडे जाण्याचा मार्ग आहे.

सत्याची पुर्ती अहिसेंच्या मार्गाने प्राप्त होते. गांधीवादात अहिंसेची कल्पना केवळ नकारात्मक नसून तिला सकारात्मक अर्थ आहे. दुसऱ्याला शारीरीक अथवा मानसीक पीडा न देणे असा अहिसंचा अर्थ आहेच; त्याचबरोबर सद्भावना आणि प्रेम या गुणांच्या जोरावर हिंसा करणाऱ्या व्यक्तींच्या वृत्तीत बदल घडवून आणणे असा सकारात्मक आशय देखील अहिंसा तत्वात आहे. अहिंसा हे दुर्बलतेचे तत्व नाही. हिंसेचा अवलंब करुन एखादी व्यक्ती, जेवढी शक्तीशाली ठरेल त्याहून अहिसेंचा स्विकार केल्याने ती अधिक शक्तीशाली बनेल. हिसेंने हिसां नष्ट होत नाही तर उलट ती वाढते. जय पराजयाची भावना असते. पराजय हा द्वेषाचा हिसेंचा होत असतो.

गांधीजीचा सत्य आणि अहिसेंचा मार्ग व्यक्तीगत तसेच सामूहिकरीत्या आचरणात आणण्याचा मार्ग आहे. राष्ट्रा–राष्टांना सुध्दा परस्परातील संबधाबाबत हा मार्ग अवलंबीता येतो. या उद्देशानेच आज आंतरराष्ट्रीय संघटना, संयूक्त राष्ट्रसंघटना कार्ये करत आहेत. शांततामय व सहजीवनाच्या मार्गाने राष्ट्रांराष्ट्रांनी आपले प्रश्न सोडवावेत. ज्यामूळे हिंसाचार संपुष्टात आणण्यास यश येवू शकते. हा मार्ग भेकड, भित्रा, दुर्बल, स्वार्थी लोक अवलंबू शकत नाहीत. अन्याय व जुलूम याविरुध्द लढण्याचा हा महामंत्र आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. भा. ल. भोळे – भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार
२. मो. के. गांधी – सत्याचे प्रयोग
३. गांधी विचार पुस्तक चौथे 074 य.च.मु.वि. नाशिक
४. ना. य. डोळे – प्रमुख राजकीय विचारवंत